# Statistics of Crime against Women in Maharashtra

26th August 2013

Manasi Tatke

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(Prepared as an input for the Women's Welfare Blueprint)

# Crime Rate Statistics in Maharashtra

## Some 2012 numbers at a glance:

- Crimes against women in India is 10.2% of total crimes. (244270 incidences of crime against women reported).
- Maharashtra has the highest number (77 cases, 19.6%) of incest rape cases in India.
- National Crime Rate (Crimes against women): 41.74
- Megacity crime rate (Crimes against women): 47.76 – higher than the national rate

*(Source: Crime in India 2012-National Crime Records Bureau-Ministry of Home Affairs)*

## Total Number of reported Crimes against women during 2012

| | Total Number of Crimes against Women | Crime Rate against Women |
|---|---|---|
| **Maharashtra** | 16353 | 29.87 |
| **All India** | 244270 | 41.74 |

## India: Incidents of rape in during 2008 - 2012 and percentage variation in 2012 over 2011

| 2008 | 2009 | 2010 | 2011 | 2012 | Percentage variation |
|---|---|---|---|---|---|
| 21467 | 21397 | 22172 | 24206 | 24923 | 3% |

*Source: Crime in India 2012-National Crime Records Bureau-Ministry of Home Affairs*

## Maharashtra - Megacity Total Crime rate

| | |
|---|---|
| Aurangabad | 307.7 |
| Mumbai | 165.7 |
| Nagpur | 331.3 |
| Nashik | 280.9 |
| Pune | 243.7 |
| **Maharashtra** | **176.7** |

*Source: Crime in India 2012-National Crime Records Bureau-Ministry of Home Affairs*

## Other States – Crimes against Women Rate

| State | Crimes against Women Rate |
|---|---|
| **Maharashtra** | **29.87** |
| Karnataka | 34.92 |
| Gujarat | 33.58 |
| Tamil Nadu | 21.23 |
| Kerala | 61.21 |
| Andhra Pradesh | 66.05 |
| Delhi | 69.75 |

## Maharashtra: Top-5 districts of Highest crime against women rate

| | |
|---|---|
| Mumbai | 10.4% |
| Ahmadnagar | 5.2% |
| Thane | 4.6% |
| Jalgaon | 4.1% |
| Yavatmal | 3.8 |

*Source: Crime in Maharashtra 2012-CID-Maharashtra State Police*

## Maharashtra: Rape and related offences against women from 2010-2012

| | 2010 | 2011 | 2012 | Percentage variation during 2012 over 2011 | Percentage of total crimes against women |
|---|---|---|---|---|---|
| Rape | 1599 | 1701 | 1839 | Increased by 8.11% | 10% |
| Molestation | 3661 | 3794 | 3935 | Increased by 3.72% | 22% |
| Sexual Harrasment | 1180 | 1071 | 1294 | Increased by 20.82% | 7% |

*Source: Crime in Maharashtra 2012-CID-Maharashtra State Police*

## ❖ कायदे

- ### भारतीय दंडविधान ( )

**विनयभंग-** कोणत्याही व्यक्तीने एखाद्या महिलेचा मर्यादाभंग / विनयभंग केल्यास त्याला दंड आणि २ वर्षापर्यंतची कारावासाची शिक्षा होऊ शकते. (कलम ३५४)

**अज्ञान स्त्री-** अज्ञान स्त्रीस (१८ वर्षापेक्षा कमी वय) बेकायदेशीरपणे शरीरसंबंधासाठी एखाद्या ठिकाणी जाण्यास प्रवृत्त केले तर कलम ३६६ (ब) नुसार दंड व १० वर्षांपर्यंतची कारावासाची शिक्षा होऊ शकते.

**बलात्कार**- एखाद्या स्त्रीच्या इच्छेविरुद्ध किंवा तिला धमकावून किंवा तिला गुंगीचे औषध देऊन/ फसवून/ दारू पाजून तिच्याशी केलेला शरीरसंबंध म्हणजे 'बलात्कार' होय. (कलम ३७५-३७६) बलात्काराच्या गुन्ह्यासाठी ७ वर्षे कारावास ते जन्मठेप अशी शिक्षा होऊ शकते.
**१६ पेक्षा कमी वय** असलेल्या स्त्रीची शरीरसंबंधासाठी परवानगी ही 'परवानगी' मानली जात नाही. कोणत्याही परिस्थितीत तो गुन्हाच ठरतो.
**निसर्गनियमांच्या विरोधात** जाऊन एखाद्या पुरुषाने स्त्री बरोबर शरीर संबंध केल्यास त्याला १० वर्ष कारावासाची शिक्षा होऊ शकते.

एखाद्या विवाहित स्त्रीचा पती किंवा नातेवाईक तिला **क्रूर वागणूक** देत असतील तर कलम ४९८-अ नुसार संबंधितास ३ वर्षापर्यंतचा कारावास आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते.

एखाद्या स्त्रीने **आत्महत्या** केल्यास तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तीस, तशी परिस्थिती निर्माण करणाऱ्या व्यक्तीस १० वर्षांपर्यंत कारावास आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते.

एखादी व्यक्ती एखाद्या **स्त्रीच्या गर्भपातास कारणीभूत** ठरली तर त्या व्यक्तीस ७ वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा होते. संबंधित स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भपात करण्यात आला तर मात्र दोषी व्यक्तीस १० वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होते. (कलम ३१२). स्त्रीच्या **संमतीशिवाय गर्भपात करताना स्त्रीचा मृत्यू** झाला तर दोषी व्यक्तीस जन्मठेप होऊ शकते.

एक पत्नी जिवंत असताना **उघडपणे दुसरा विवाह** करणाऱ्या व्यक्तीस ७ वर्षे कारावास व दंड होऊ शकतो. तसेच एक पत्नी जिवंत असताना ते **लपवून दुसरा विवाह** करणाऱ्या व्यक्तीस १० वर्षे कारावासाची शिक्षा होऊ शकते.

- **प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान चिकित्सा बंदी कायदा (१९९४)**

या कायद्याच्या कलम ६ नुसार गर्भलिंग निदान करणे, म्हणजेच गर्भ मुलगी आहे की मुलगा आहे याची तपासणी करणे यास कायद्याने बंदी आहे. तसे करणाऱ्या व्यक्तीस कलम २२ नुसार ३ वर्षांपर्यंत कारावास आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते. यामध्ये डॉक्टर सहभागी असल्यास त्याला वैद्यकीय व्यवसाय करण्यास बंदी घातली जाते.

- **हुंडाप्रतिबंधक कायदा (१९६१)**

या कायद्यानुसार हुंडा देण्यास व घेण्यास बंदी आहे. एखाद्या विवाहित स्त्री चा मृत्यू झाला आणि नजीकच्या काळात तिचा छळ होत असल्याचे निदर्शनास आले किंवा तिच्याकडे हुंड्याची मागणी केलेली असल्याचे निदर्शनास आले तर त्या स्त्रीचा मृत्यू हा 'हुंडाबळी' मानण्यात येतो.

- **कामाच्या ठिकाणची सुरक्षितता आणि सोयी- कायद्यांतील तरतूदी.**

१) **फैक्टरीज् ऐक्ट (१९४८)** या कायद्यात कामाच्या ठिकाणी महिलांना कोणत्या सोयी सवलती द्याव्यात याविषयी सांगितले आहे.

या कायद्यानुसार कार्यालयांमध्ये **महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे** असणे बंधनकारक आहे. (कलम १९)

विशिष्ट **यंत्रे चालू असताना देखभालीचे काम**, तेलपाणी करणे, स्वच्छ करणे हे कलम २२ नुसार महिलांना बंधनकारक नाही.

कलम २७ नुसार कापूस/कपडाशी संबंधित फैक्टरी मध्ये **धोकादायक कामे** महिलांनी करण्याची गरज नाही.

या कायद्याचे कलम ४८ असे सांगते की जर एखाद्या ठिकाणी ३० पेक्षा जास्त महिला काम

करत असतील तर महिलांच्या ६ **वर्षांखालील मुलांसाठी स्वतंत्र खोलीची** (पाळणाघराची) चांगली व्यवस्था असणे बंधनकारक आहे.

२) <u>**समान वेतन कायदा (१९७६)**</u> असे सांगतो वेतन **देताना स्त्री-पुरुष असा भेद करता येणार नाही**. एकाच पातळीवरचे काम स्त्री- पुरुष करत असतील तर त्यांचे वेतनही समानच असले पाहिजे. याचे पालन झालेले नाही असे निदर्शनाला आल्यास दोषी व्यक्तीस तीन महिने ते १ वर्षापर्यंतचा कारावास आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते. (कलम ४ व ५)

३) <u>**मातृत्वविषयक कायदा (१९६१)**</u> यानुसार महिलेस प्रसूतीपूर्वी ६ आठवडे व प्रसूती नंतरचे ६ आठवडे पूर्णपगारी रजा मिळाली पाहिजे. अशी रजा मिळणे हा गर्भवती महिलेचा हक्क आहे. (कलम ५)

संबंधित महिलेला त्या वर्षात किमान ८० दिवस काम केले असेल आणि दुर्दैवाने तिचा गर्भपात झाला तरीही अशी रजा मिळणे हा त्या महिलेचा हक्क आहे.

तसेच या कायद्यानुसार **गर्भवती महिलेस शारीरिक श्रमांची कामे** व शरीरावर ताण येईल अशी कठीण/अवघड कामे देण्यात येऊ नयेत.

४) <u>**अनैतिक वाहतूक प्रतिबंध कायदा (१९५६)**</u> नुसार कोणत्याही महिलेस **शरीरविक्रय करण्यास भाग पाडणे** हा गुन्हा असून त्यास ३ वर्षे कारावासाची शिक्षा होऊ शकते. तसेच १८ वर्षांवरील कोणतीही व्यक्ती देहविक्रय करणाऱ्या महिलेच्या उत्पन्नावर जगत असेल तर त्यास २ वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते. (कलम ४)

५) एखाद्या सार्वजनिक अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने आपल्या विभागातील किंवा त्या **विभागाअंतर्गत काम करणाऱ्या महिलेबरोबर शरीरसंबंध** करण्याचा प्रयत्न केल्यास तो गुन्हा ठरतो.

तसेच **एखाद्या तुरुंग अधिक्षकाने आपल्या हाताखालच्या महिलेबरोबर** किंवा **इस्पितळातील व्यवस्थापकाने इस्पितळातील महिलेबरोबर** शरीसंबंध ठेवल्यास तो गुन्हा ठरतो. यासाठी ५ वर्षांचा कारावास व दंड अशी तरतूद आहे.

६) **प्रत्येक कार्यालयात एक तक्रार समिती** असावी व त्यात ५०% पेक्षा जास्त महिला असाव्यात. तसेच समितीचे अध्यक्षपदसुद्ध महिलेकडेच असावे असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने १९९२ मध्ये एका खटल्याच्या निकालात दिला. ही समिती कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाबाबत चौकशी करू शकते. लांगिक छळाची व्याख्या पुढीलप्रमाणे-

अ) शारीरिक लगट करणे.

ब) शरीरसंबंधाची मागणी करणे/ विनंती करणे.

क) अश्लील विनोद करणे. लैंगिक शेरेबाजी करणे.

ड) अश्लील साहित्य दाखवणे.

इ) लैंगिकताविषयक (तोंडी किंवा अन्य प्रकारची) चुकीची वागणूक.

७) कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळापासून सुरक्षा देण्यासाठी केंद्र सरकारने नुकतेच एक विधेयक (            , 2010.) लोकसभेत मांडून पारित केले आहे. अद्याप (जानेवारी २०१२) त्याचे कायद्यात रुपांतर झालेले नाही.

- ## इतर काही महत्वपूर्ण कायदेशीर तरतूदी

१) **विवाहाच्या वेळी मुलीचे वय** किमान १८ असणे बंधनकारक आहे तर मुलाचे वय किमान २१ असावे.

२) विवाहित महिलेस सुद्धा लैंगिक छळ, बलात्कार, अनैसर्गिक शरीरसंबंध, पाशवी वागणूक याबाबत विशेष अधिकार देण्यात आले आहेत. व अशा वेळी पतीविरोधात पोलिसात तक्रार करण्याचे अधिकार महिलेस आहेत.

३) **पोलीस आणि महिला** याबाबत काही स्पष्ट आणि कडक कायदे करण्यात आलेले आहेत.

अ) १५ वर्षांखालील महिलांना पोलीस कोणत्याही कारणास्तव पोलीस ठाण्यात बोलावून घेऊ शकत नाही.

ब) सूर्यास्तानंतर व सूर्योदयापूर्वी महिलांना पोलीस ठाण्यात बोलावता येऊ शकत नाही.

क) अगदीच अपरिहार्य असल्याशिवाय कोणत्याही महिलेस रात्री पोलीस कोठडीत ठेवता येणार नाही.

ड) महिलेस अटक करताना अटकेची कारणे, अटक केलेल्या महिलेस जेथे ठेवले जाणार आहे त्या जागेची माहिती, न्यायालयासमोर त्या महिलेस कधी सादर केले जाणार आहे इत्यादी सर्व माहिती असलेला मेमो तिच्या नातेवाईकांना किंवा शेजाऱ्यांना देणे बंधनकारक आहे.

इ) स्त्री ची झडती घ्यायची असल्यास सुयोग्य सुसभ्य पद्धतीने दुसरी स्त्रीच झडती घेऊ शकते.

फ) उप निरीक्षक किंवा त्यावरील पदावरची व्यक्तीच महिलेस अटक करू शकते. तसेच

महिलेस अटक करायची असल्यास संबंधित अधिकाऱ्याने त्याची माहिती अधीक्षकास देणे बंधनकारक असते.

ग) अटक झालेल्या महिलेस मोफत न्याय्सेवा मिळवण्याचा हक्क आहे. (न्याय्सेवा प्राधिकरण कायदा १९८७- कलम १२). ही न्याय्सेवा मोफत मिळण्याची जबाबदारी संबंधित न्यायालयाचीही आहे.

## ❖ राष्ट्रीय महिला आयोग

१९९० मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची कायदेशीररित्या स्थापना करण्यात आली. हा आयोग देशातील महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनांकडे लक्ष ठेवतो. तसेच केंद्र व राज्य सरकारांकडे शिफारशी करू शकतो. तसेच सध्याच्या प्रचलित कायद्यांमध्ये काही कमतरता असेल किंवा काही तरतूदी महिलाविरोधी असतील तर त्याविषयी सुधारणांची शिफारस हा आयोग करतो.